Literacy for a Billion

Movie: Dhangad dhinga
Year: 1999

Song: Taak dhina dhin
Lyricist: Sudhir Moghe

ताक् धिना धिन्
हे तारा गं तारा
कडी ही दारा
झालोय वेडा मी भुंगा
तारा गं तारा
कडी ही दारा
झालोय वेडा मी भुंगा
अगं नको नको दूर जाऊ
गुलू गुलू बोलू
चल घालूया धांगडधिंगा
कुलूप घाला वेड्या मनाला
करू नका तुम्ही दंगा
अहो कुलूप घाला वेड्या मनाला
करू नका तुम्ही दंगा
असं टकमक पाहू नका
येऊ नका मागं
अहो कळंल आईचा इंगा
तारा गं तारा
कडी ही दारा
झालोय वेडा मी भुंगा
अहो कुलूप घाला वेड्या मनाला
करू नका तुम्ही दंगा
ताक् धिना धिन्
आं...
दोघात तीसरं नाही कुणी गं
गुणाची बायको माझी
अहो साखर पेरणी केलीत तरीही
होणार नाही मी राजी
अगं अगं

दोघात तीसरं नाही कुणी गं
गुणाची बायको माझी
हां साखर पेरणी केलीत तरीही
होणार नाही मी राजी
ए नको चालू तुरूतुरू
सांग सांग किती झुरू
वाराही झोंबतोय अंगा
तारा गं तारा
कडी ही दारा
झालोय वेडा मी भुंगा
अहो कुलूप घाला वेड्या मनाला
करू नका तुम्ही दंगा

भिंतीला फुटले कान तरीही
कुणाची पर्वा नाही
अहो राजाराणीच्या राज्यात आपल्या
भलत्याला प्रवेश नाही
अगं भिंतीला फुटले कान तरीही
कुणाची पर्वा नाही
आं राजाराणीच्या राज्यात आपल्या
भलत्याला प्रवेश नाही
ओय फूलावानी दोघं फुलू
झोक्यावर दोघं झुलू
रात बघ आलीया रंगा
तारा गं तारा
कडी ही दारा
झालोय वेडा मी भुंगा
अहो कुलूप घाला वेड्या मनाला
करू नका तुम्ही दंगा

अगं नको नको दूर जाऊ
गुलू गुलू बोलू
चल घालूया धांगडधिंगा
थांबा हो जरा
झोपू दे पोरा
वाजवेल मध्येच भोंगा
अहो थांबा ना जरा
झोपू दे पोरा
वाजवेल मध्येच भोंगा
भोंगा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*